# महाराष्ट्र शासन

जाहिर फेर लिलाव

वाहन विक्रीची निविदा सुचना

संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली वन विभाग

तमाम इच्छुक खरेदीदारांना कळविण्यात येते की, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली वनविभागातील निर्लेखित केलेल्या वाहनांचा लिलाव जेथे जसा आहे त्या तत्वावर मोहरबंद निविदा पध्दतीने लिलाव **दिनांक ११/१०/२०२१** रोजी दुपारी ३.३० वाजता वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली यांचे कार्यालयात करण्यात येणार आहे.

| अ.क्र. | वाहन ठेवलेले ठिकाण | वाहन प्रकार | वाहनाचा दर्शनी नोंदणी क्र. | वाहन खरेदी वर्ष | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | अधिक्षक सिंह विहार कार्यालय संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली | टाटा इंडीगो कार | MH-०२-AK-००६३ | सन २००८ | वाहनाचा तपशिल ढोबळ मानाने दिलेला आहे. तरी वाहनाची प्रत्यक्ष जागेवर पाहणी करुन निविदा देणा-यांनी निविदा भराव्यात. |

१) शासकिय निर्लेखित वाहन **दि १८/१०/२०२१ ते २७/१०/२०२१** या कालावधील (सुटटीचे दिवस सोडून) वर नमुद केलेल्या ठिकाणी प्रत्यक्ष पाहता येतील. निविदा पत्रकाची किंमत प्रत्येकी रु.३००/- राहील.

२) निविदा स्विकृतीसाठी निविदापेटी **दिनांक ०१/११/२०२१** रोजी सकाळी ११.०० ते दुपारी २.०० वाजेपर्यन्त विभागीय कार्यालयात ठेवणेत येईल.

३) सदर शासकिय निर्लेखित वाहनांच्या सविस्तर अटी / शर्ती / नियम इत्यादी www.mahaforesg.gov.in / sgnpmaharashtra.gov.in वर अपलोड करण्यात येत आहे.

निविदा विक्रि **दिनांक १८/१०/२०२१ ते २७/१०/२०२१** या कार्यालयीन कामकाजाचे दिवशी कार्यालयीन वेळेत वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली यांचे कार्यालयात रु. ३०० (तीनशे रुपये मात्र) प्रती निविदा या (नापरतावा) किमतीस उपलब्ध होतील. निविदा सोबत खरेपणासाठी इसारा म्हणून रक्कम रु. ५०००/- (रुपये पाच हजार मात्र) चा वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली वा Conservator of Forest & Director, Sanjay Gandhi National Park Borivali यांना देय असा कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेचा डिमांड ड्राप्ट जोडणे आवश्यक आहे. इसारा रक्कमे शिवायचे निविदा पत्रक विचारांत घेतली जाणार नाहीत.

लिलाव शर्ती, नियम हे कार्यालयीन वेळेत व कामाचे दिवशी वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली यांचे कार्यालयात पाहावयास मिळतील.

ठिकाण :- बोरीवली

दिनांक :- /१०/२०२१

(जी. मल्लिकार्जुन)

वनसंरक्षक व संचालक,

संजय गांधी राष्ट्रीय उद्यान

बोरीवली

**महाराष्ट्र शासन**

वाहन विक्रीची फेर निविदा सुचना

संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली वन विभाग

१. निविदा प्रपत्र विक्री **दिनांक १८/१०/२०२१ ते दिनांक २७/१०/२०२१** (सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत) संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली (पूर्व) मुंबई ४०० ०६६ (दूरध्वनी क्रमांक ०२२-२८८६०३६२) यांचे कार्यालयात कार्यालयीन दिवशी व वेळेत सुरु राहील.

२. निविदा प्रपत्राची किंमत रक्कम रुपये ३००/- राहील.

३. निविदा **दिनांक ०१/११/२०२१** रोजी दुपारी २.०० वाजेपर्यत निवीदा पेटीत या कार्यालयाच्या घडयाळाप्रमाणे स्विकारण्यात येतील. या वेळेनंतर प्राप्त होणाऱ्या निवदा स्विकारल्या जाणार नाही.

४. सुयोग्य प्रकारे पुर्णत:तपशिल भरलेल्या मोहरबंद निविदा (बंद लिफाफा) वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली यांचे कार्यालयात **दिनांक ०१/११/२०२१** रोजी दुपारी ३.३० वाजता स्थापीत समिती समक्ष उघडण्यात येतील.

५. निविदा प्रपत्रासोबत वाहनासाठी ५०००/- (अक्षरी:- पाच हजार रुपये मात्र) अनामत रक्कमेचा धनाकर्ष (डिमांड ड्राप्ट) Conservator Forest and Director Sanjay Gandhi National Park Borivali यांचे नावे असलेला जोडणे आवश्यक आहे. धनाकर्ष राष्ट्रीयकृत बँकेचा असावा. सदरची निविदा बंद लिफाफा पध्दतीने असल्यामुळे निविदा प्रपत्रासोबत निवदा धारकाचे पॅन कार्ड, आधार कार्ड, रहिवासी पुरावा इ. ची स्वंय साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक राहील. अनामत रक्कमे शिवाय निविदा प्रपत्र भरलेले असल्याचे दिसुन आल्यास सदरची निविदा रद्द समजण्यात येईल.

६. निविदा रक्कमेमध्ये अक्षरी व अंकामध्ये भरलेल्या रक्कमेमध्ये तफावत असल्यास जी रक्कम अधिकतम असेल ती रक्कम स्विकारण्यात येईल.(सोबत निवीदा फॉर्म जोडला आहे)

७. विक्री किंमतीवर प्रचलित नियमानुसार अनुज्ञेय सर्व कर भरावा लागेल.

८. यशस्वी निविदाधारकाने निविदा मंजुर झाल्याचे दिनांकापासुन ७ दिवसाचे आत अनामत रक्कम वजा जाता उर्वरीत विक्री किंमत प्रचलीत नियमानुसार अनुज्ञेय सर्व करासह एकाच वेळी धनाकर्षाव्दारा भरणा करणे आवश्यक राहील.

९. विक्रसाठी ठेवण्यात आलेले वाहन निविदा धारकास पाहण्यासाठी वाहन क्र. MH-०२-AK-००६३ टाटा इंडीगो कार संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात वाहन कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी व वेळेत निविदाधारक पाहू शकतील.

१०. सदरची वाहने ज्या स्थितीत आहेत त्याच स्थितीत विक्रीसाठी ठेवण्यात आलेले आहे. निविदाधारकाने निविदा भरण्यापूर्वी सदर वाहनाचे पुर्ण निरिक्षण करुनच तसेच त्यांचे पूर्ण समाधाना अंतिच निविदा दाखल केली आहे असे गृहित धरण्यात येईल व नंतर वाहनाच्या स्थितीबद्दल कोणतीही तक्रार ऐकूण घेतली जाणार नाही. तसेच, यशस्वी निविदा धारकास वाहनाची विक्री झाल्यामुळे सदर वाहनाचे कोणतेही सुटे भाग अलगरित्या किंवा बदलवुन मिळणार नाही.

११. यशस्वी निविदाधारकाकडुन दिलेल्या मुदतीमध्ये रक्कम भरणा करण्यात कसुर केल्यास भरणा करण्यात आलेली अनामत रक्कम सरकारजमा करण्यात येईल व या रक्कमेवर निविदाधारकाचा कोणताही अधिकार राहणार नाही. तसेच सदर वाहनाची फेरविक्री मुळ निविदाधारकाचे जोखीम व जबाबदारी निविदा पध्दतीने करण्यात येईल व फेरविक्रीत सदर वाहनास कमी किंमत प्राप्त झाल्यास शासनाचे झालेले नुकसान त्यांचेकडून जमीन महसुलाची थकबाकी म्हणुन वसुल करण्यात येईल.

१२. यशस्वी निविदाधारकाकडून दिलेल्या मुदतीमध्ये पूर्ण रक्कम भरल्यानंतर वाहन ज्या स्थितीत आहे त्या स्थितीत निविदा मंजूरीच्या दिनांकापासून ०७ दिवसाचे आत ताब्यात घावे लागेल. जर दिलेल्या मुदतीमध्ये वाहन ताब्यात घेतले नाही तर त्यापुढील वाढीव ०७ दिवस मुदती करीता प्रत्येक दिवसासाठी प्रत्येक वाहनासाठी रक्कम रुपये १००/- (शंभर रुपये) प्रमाणे दंड वाहन ताब्यात घेतल्याच्या दिवसापर्यंत आकारण्यात येईल. या १४ दिवसाच्या मुदतीत वाहन ताब्यात न घेतल्यास सदरची निविदा रद्द समजण्यात येऊन या संबंधी भरणा केलेली रक्कम सरकारजमा करण्यात येईल.व पुढील कारवाई नियमानुसार करण्यात येईल.

१३. यशस्वी निविदाधारकाने खरेदी केलेल्या वाहनांची भंगार म्हणून विक्री करण्यात येत असल्यामुळे या कार्यालयाकडून संबंधित वाहनाचे कोणतेही मुळ दस्ताऐवज पुरवठा केले जाणार नाही. यास्तव सदर वाहने रस्त्यावर चालवावयाचे असल्यास प्रादेशिक परीवहन कार्यालयाकडून नावे करण्याची संपूर्ण जबाबदारी मुळ निविदाधारकाची राहील. तसेच सदर नोंदणी करीता लागणारी रक्कम व इतर कर व शुल्क या पोटी येणारा सर्व खर्च निविदाधारकास करावा लागेल. वाहनाचे नोंदणीसाठी व त्यावरील येणाऱ्या इतर सर्व खर्चासाठी वनसंरक्षक व संचालक संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली हे कोणतीही जबादारी स्विकारणार नाही.

१४. यशस्वी निविदाधारकास वाहनाबाबतची कोणतीही सुट प्रमाणपत्र (ॲक्ट्राय किंवा इतर कर) या कार्यालयातर्फे देय राहणार नाही.

१५. यशस्वी बोलीधारकास लिलावाची संपूर्ण रक्कम लिलाव मंजूर झाल्यानंतर धनाकर्षाव्दारे लिलावाची रक्कम व लिलावच्या रक्कमेवरील कर (GST) असे स्वतंत्र दोन राष्ट्रीयकृत बँकेचे धनाकर्ष (DD) या कार्यालयास पाच दिवसाच्या आतमध्ये जमा करावे लागतिल.

१६. अयशस्वी निविदाधारकाने भरलेली अनामत रक्कम धनाकर्ष त्यांना निविदा उघडण्यात आलेल्या दिवशीच परत करण्यात येईल. यास्तव सदर रक्कमेवर परतीच्या कालावधीसाठी कोणतेही व्याज देय राहणार नाही.

१७. विक्रीकरीता ठेवण्यात आलेल्या शासकीय वाहनांची किंमत निर्धारीत किंमतीपेक्षा (Up set Price) कमी नमूद केल्यास यशस्वी निविदाधारकाची निविदा रद्द ठरविण्यात येईल. यशस्वी निविदाधारकाने प्रस्तावित केलेली रक्कम अपेक्षीत किंमती एवढी किंवा त्यापेक्षा जास्त असणे गरजेचे राहील याची नोंद घ्यावी.

१८. कोणतेही कारण नमूद न करता कोणतीही निविदा अथवा सर्व निविदा नाकारण्याचा आणि निविदापेटी उघडण्याच्या दिनांक व वेळेत बदल करण्याचा हक्क व सदर वाहनाच्या निर्धारीत किंमतीपेक्षा कमी रक्कम प्राप्त झाल्यास वाहनाची विक्री रद्द करण्याचे संपूर्ण अधिकार वनसंरक्षक व संचालक संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली यांनी राखून ठेवलेले आहे. त्यांचा निर्णय सर्व निविदाधारकांसाठी अंतिम व बंधनकारक राहील.

१९. सदर वाहनाच्या विक्री संबंधिची कोणत्याही अटी व शर्तीच्या निर्णयाबाबत वाद उपस्थित झाल्यास वनसंरक्षक व संचालक संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली यांनी दिलेला निर्णय अंतिम राहील व तो निर्णय सर्व निविदाधारकास बंधनकारक राहील.

२०. अधिक चौकशी व माहितीकरीता वनसंरक्षक व संचालक संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली याचे कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी व कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

*********